# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई-४००००१.
PH:2264 1150,2 264 1151, 22620601, 22690602, FAX:2692102
Telegram : Edutech E-Mail : director@dte.org.in Website: http://www.dte.org.in


क्रमांक :- अ.सं./शिष्यवृत्ती/२०१०/०३४
दिनांक :- ९/२/२०१०

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासकीय अनुदानित, विना अनुदानित
तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी महाविद्यालये,
औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये, वास्तुशास्त्र महाविद्यालये,
हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी व पदविका
संस्था, एमबीए, एमसीए महाविद्यालये.

विषय:- अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज पाठविण्याबाबत.
संदर्भ:- या कार्यालयाची अधिसूचना क्रमांक डिटीई/अ.स./एसजीएस/२०१०/०३०

वरील संदर्भीत अधिसूचनेनुसार सर्व तांत्रिक संस्थेतील मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, बौध्द, पारशी, जैन या अल्पसंख्यांक धर्माच्या पदवी व पदविका अभ्यासक्रमामध्ये शिकणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेले आहेत. अल्पसंख्यांक समुदायाकडून पुरेसा प्रतिसाद मिळत नाही त्यामुळे शासनाकडून वारंवार सूचना येत आहेत.

तरी सर्व प्राचार्यांनी याबाबतचे परिपत्रक सर्व वर्गामधून वाचून दाखवावे. आपल्या संस्थेमध्ये प्रवेश घेतलेल्या अल्पसंख्यांक समुदायाच्या विद्यार्थ्यांची यादी आपल्याकडे आहे. त्यानुसार प्रथमवर्ष ते अंतिम वर्षात शिकत असणाऱ्या सर्व अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे. संस्थेमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी तंत्र शिक्षण संचालनालयाकडे देखील आहे. ज्या संस्थांमधून अल्पसंख्यांक पात्र सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त होणार नाहीत अशा संस्थांच्या प्राचार्यांवर कारवाई करण्यात येईल याची प्राचार्यांनी नोंद घ्यावी.

(डॉ. सु. का. महाजन)
प्र.संचालक तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,
१. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२
२. मा.प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग,मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२
३. सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर,औरंगाबाद, अमरावती यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.